# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

दिनांक १६.०४.२०२६ गुरुवार

(कामगिरी)

**अजनी पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०४.२०२६ चे १९.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी चे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत न्यु बाबुलखेडा, मैत्री बुध्दहविहार जवळील खली यांचे घराचे बाजुचे झोपडीमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी राहणारा आरोपी क्र. १) निलेश उर्फ खली राहूल गेडाम वय ३० वर्षे, २) शुभम कामेश्वर बेले वय २५ वर्षे, रा. तिनमुंडी झेंडा, नवीन बाबुलखेडा, अजनी, नागपुर ३) अविनाश नरेश डोंगरे वय २८ वर्षे ४) शुभम संजय चव्हाण वय ३४ वर्ष ५) श्रीकांत कैलास पडदे वय ३३ वर्ष ६) भुषण नत्थुजी मुन वय ३८ वर्ष ७) रितीक राजू गणवीर वय २२ वर्ष ८) विपुल विजय बोरकर वय २८ वर्ष ९) अक्षय अरुण शेंडे वय २८ वर्ष १०) शुभम नरेश मेश्राम वय ३२ वर्ष ११) अक्षय रामकृष्ण खंडारे वय २६ वर्ष, सर्व रा. मैत्री बुध्दविहाराजवळ, नवीन बाबुलखेडा, अजनी हे समक्ष ताश पत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ८,८६०/—रू., ०९ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण १,१९,८९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोउपनि सिध्दांत मस्के, पोहवा मनोज नेवारे व प्रकाश, पोअं. अविनाश व मपोअं. रेशमा यांनी केली.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १६.०४.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, प्लॉट क्र. ९, मोवाडे ले आऊट, आठवा मैल, वाडी येथे राहणारा हद्यपार इसम घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून, नमुद ठिकाणी जावून चेक केले असता, एक इसम पोलीसांना पाहून पळू लागला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोहन कैलास राऊत वय २८ वर्षे असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन

केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जुनी कामठी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीय अटक.**

दिनांक १५.०४.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत, असलमभाई यांचे हॉटेलजवळ, पिली हवेली चौक, कामठी येथे फिर्यादी मुमताज अहमद वल्द मुख्तार अहमद वय २५ वर्ष रा. कोळसा टाल, कामठी हे त्यांचा मित्र नामे मोईनुद्दीन सलाउद्दीन शेख वय २६ वर्ष रा. नवाब बंडीवालेचे घराजवळ, कोळसा टाल, कामठी, नागपूर व इतर दोन तीन मित्रांसोबत बसून बोलत होते. तेथे त्यांचा परिचीत शफीक वल्द मोहम्माद रफिक अंसारी वय २६ वर्ष रा. ढोर दवाखान्याजवळ, इस्माईलपुरा, नवीन कामठी हा एका मुलासोबत त्याचे गाडीने आला. मोईनुद्दीन सलाउद्दीन याने शफिक यास सकाळी काही पैसे उधार दिले होते. त्याने शफिक यास 'सुबह दिये हुये पैसे कब वापर करेंगा' असे म्हटले असता, शफिक याने शिवीगाळी केल्याने त्या दोघांमध्ये मारपीट झाली व शफिक याने त्याचे गाडीचे डिक्कीतून चाकू काढून मोईनुद्दीन सलाउद्दीन यास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने छातीवर वार करून गंभीर जखमी केले व तेथून पळून गेला. फिर्यादी व इतर मित्र यांनी जखमी यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि भंडारी ९४०४१०८१७५ यांनी आरोपींविरूध्द कलम १०९(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, त्वरीत दखल घेवुन, आरोपीचा शोध घेवुन, आरोपीला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :—** कु. भाग्यश्री विजय पवार वय १९ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४७९, आशिर्वाद नगर, सक्करदरा, नागपूर ही दिनांक ०९.०४.२०२६ चे दुपारी १२.०० ते १८.०० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतून राहते घरी गावाला जाते असे सांगून कपडयांची बॅग घेऊन घरुन निघून गेली, आजपावेतो गावी पोहोचली नाही तसेच घरीही परत आलेली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे व लांब, भाषा—मराठी व हिंदी बोलते. अंगात पांढ—या रंगाचा जिन्सपॅन्ट व काळया रंगाचा शर्ट घातलेला आहे. सोबत मरुन रंगाचा दुपट्टा व स्कुल बॅग आहे. ओळखचिन्ह — पाठीवर उजवे बाजूस दोन लहान मोठे फुलपाखरु गोंदलेले आहेत.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :—** शुभम शांतारामजी रडके वय २९ वर्षे, रा. प्लॉट क्र. ७५, गणेशनगर, बहादुरा, सक्करदरा, नागपूर हा दिनांक १५.०४.२०२६ रोजीपासून पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरी कोणालाही काही न सांगता निघून गेला, आजपावेतो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा—लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे, दाढी मिशी वाढलेली, अंगात मिलीट्री रंगाचा फुलबाहीचा टिशर्ट व तपकिरी रंगाचा फुलपॅन्ट घातलेला असून हिंदी व मराठी भाषा बोलतो. उजवे हातावर त्रिशुळ चिन्ह गोंदलेले आहे व गळयावर काळया रंगाचा चट्टा आहे.



कु. भाग्यश्री



शुभम

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | को.क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब नागपूर. | ३०३२६०/२०११ | कलम ८२ सीआरपीसी | अब्दुल रशीद वल्द अब्दुल रज्जाक शाह वय २८ वर्ष रा. यशोधरानगर, नुरी मस्जिदजवळ, नागपूर | १८.०४.२०२६ |
| २ | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब नागपूर. | ३०५०२००/१९९६ | कलम ३२६ भादंवि | शेख इसराईल शेख युसूफ रा. मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपूर | २०.०४.२०२६ |
| ३ | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब नागपूर. | ३०५००२१/१९९८ | कलम ४५७,३८० भादंवि | १) देवचंद बैंगा शिववंशी वय २८ वर्ष रा. देशपांडे ले आऊट, जैन यांचे घरी किरायाने, पो.ठाणे कोतवाली, नागपूर<br>२) योगेश्वर माधवराव शिंगणे रा. पवनगाव, कामठी, नागपूर. | २४.०४.२०२६ |
| ४ | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब नागपूर.. | ३००५९९/२००८ | कलम ३७९,३४ भादंवि | बाबुराव उर्फ बाबु जगदेवराव भंडारे वय २७ वर्ष रा. भंडार कोमटेची वाडी, ता. कंधार जि. नांदेड. | २४.०४.२०२६ |
| ५ | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब नागपूर. | ३०५०३०९/२००३ | कलम ३८०, ५११ भादंवि | जितेंद्र उर्फ सुभाष रघुवीर अहेरवार रा. कथीया, ता. तारसिंघाड जि. राजगड पो.ठाणे पचोर, मध्यप्रदेश. | २१.०४.२०२६ |
| ६ | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, साहेब | ३०५०३६५/१९९९ | कलम ३२५, ४९८ भादंवि | प्रेमकुमार के. शर्मा रा. गंगा—जमुना, मनोहर करंगवार चे घरी, लकडगंज, नागपूर. | २४.०४.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**

## वाहतुक शाखा प्रेसनोट :

**अ)** वाहतूक परिमंडळ अजनी, वाहतूक परिमंडळ अजनी, नागपूर शहर हद्दीतील शताब्दी नगर चौक ते रामटेके नगर पर्यंत १५० मिटर सिमेंट रोडचे बांधकाम, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ०१ नागपूर तर्फे द्रिष्टी स्ट्रक्चलर इंजीनिअरींग प्रायव्हेट लिमिटेड कडुन करण्यात येणार आहे. सदरच्या भागात दिवस/रात्र व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे.

- शताब्दी चौकाकडुन मनिष नगर कडे जाणारी वाहतूक ही बाजुला लागून असलेल्या मार्गाने वळविण्यात येत आहे.
- मनिष नगर कडुन शताब्दी चौकाकडे जाणारी वाहतूक ही पुर्ववत शताब्दी चौका कडे सुरळीत सुरू राहील.
- कंत्राटदार यांनी सुरळीत व सुरक्षीत वाहतूक नियमन करीता आवश्यक वाहतूक सुरक्षा रक्षक नेमण्यात येवुन आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात.

**सदर अधिसुचना दि. २१.०४.२०२६ रोजी पासून २०.०५.२०२६ पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

ब) वाहतूक परिमंडळ सिताबर्डी हद्दीत मे.श्रीनिवासा लक्ष्मी कन्सट्रक्शन तर्फे मोरभवन बस स्टॉप समोर पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर काम ६० दिवसात दिवस/रात्री करण्यात येणार आहे. त्या करीता वाहतुक वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत अधिसुचना काढणे आवश्यक आहे. म्हणुन माझी अशी खात्री झाली आहे की, वाहतूकीस अडथळा निर्माण होवू नये, वाहतूक सूरळीत राहावी, व वाहन चालकांची गैरसोय होवू नयत्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**झाशी राणी चौक ते व्हेरायटी चौक तसेच व्हेरायटी चौक ते झाशी राणी चौकाकडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- लोकमत चौकाकडुन व्हेरायटी चौकाकडे जाणारी संपुर्ण वाहतूक झाशीराणी चौकातून उजवे वळण घेवुन मुंजे चौक येथुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौकाकडे आवश्यकते प्रमाणे जाईल.
- व्हेरायटी चौकाकडुन लोकमत चौकाकडे जाणारी संपुर्ण वाहतूक मुंजे चौक येथुन उजवे वळण घेवुन झाशी राणी चौक मार्गे लोकमत चौकाकडे आवश्यकते प्रामाणे जाईल.

**सदरची अधिसूचना दिनांक १७.०४.२०२६ ते १६.०५.२०२६ पावेतो अमंलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/-
( **लोहित मतानी,** भापोसे )
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर